# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक २२.०८.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २१/०८/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ८५ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ६१,७००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंमर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.२१/०८/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयातील पोलीस स्टेशन हटटा ०३,हटटा ०१ असे एकुण ०४ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन २८.९८लिटर दारू असा एकुण १३,४७०/—रू.कि.चा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**चोरी** :— दिनांक २१/०८/२०२२ रोजी फिर्यादी शंकर रामजी गोरे रा डिग्रस बु ता कळमनुरी जि हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे आ.बाळापुर येथे कलम ४५७,३८०,५११ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.२०.०८.२०२२ रोजीचे रात्री २१.३० वा दरम्याण फिर्यादीचे राहते घरी मौजे डिग्रस बु येथे आरोपीने चोरी करण्याचे उदेशाने फिर्यादीचे घरात प्रवेश केला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात आ.बाळापुर पोलीस तपास करित आहेत.

**अपघात** :—दिनांक २१/०८/२०२२रोजी फिर्यादी शिवाजी पि भगवान शिंदे रा बोडखी ता जि हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे हिंगोली ग्रा.येथे कलम २७९,३३७,३३८,४२७, भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.०२.०१.२०२२ रोजीचे २०.०० वा ते २०.३० वा च्या दरम्याण मौजे आडगाव पाटी ते अंबाळा दरम्याण रोडवर आरोपी मोटार सायकल क्र एमएच २० एफ डी ४६९५ च्या चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगात निष्काळजीपणे व हयगई ने चालवुन फिर्यादी चालवित असलेली मोटार सायकल क्र एमएच ३८ एए १५३० ला पाठीमागुन जोराची धडक देवुन फिर्यादीस उजव्या पायाचे मांडीला व पिंढरीला गंभीर जखमी करून व फिर्यादीचे सोबतचे साक्षीदारास डोक्यास कमरेला दुखापत करून व फिर्यादीचे मोसा चे नुकसान केले म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हिंगोली ग्रा.पोलीस तपास करित आहेत.